**आरोग्य विभाग जिल्हा परिषद वाशिम**
**सुधारित मार्गदर्शक सुचना**
**जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत गट क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीचे जाहिर प्रकटन**
**क्रमांक :-२८८६/२०२१ दि. ०६/०९/२०२१**

**जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट क या संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीचे जाहिर प्रकटन दैनिक देशोन्नती अकोला मराठी अ वर्ग, दैनिक पुण्यनगरी अकोला मराठी ब वर्ग, दैनिक निर्भय संचार वाशिम मराठी क वर्ग व साप्ताहीक विदर्भ मतदार मराठी अ वर्ग या वृत्तपत्रामध्ये तसेच जिल्हा परिषदेच्या www.zpwashim.in व शासनाच्या www.maharddzp.com या संकेत स्थळावर दि.२५/०८/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आले. त्यामध्ये ग्रामविकास विभाग, शासन शुद्धिपत्रक क्र.संकिर्ण-२०२०/प्रक्र.९९/आस्था-८ दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ अन्वये प्राप्त सुधारित मार्गदर्शनानुसार खालील प्रमाणे बदल करण्यात आलेला आहे. याबाबत संबंधित उमदेवारांनी नोंद घ्यावी.**

**उपरोक्त प्रमाणे शासन शुद्धिपत्रकानुसार ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.१४/०६/२०२१ मधील परिच्छेद क्र. १ (६) मध्ये खालील प्रमाणे नमुद करण्यात आले आहे:-**

आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक पुरुष व आरोग्य सेविका या ५ सर्वगातील प्रत्येक संवर्गाची परीक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजीत करण्यात असल्याने आता उमेदवारांना एकाच जिल्हा परिषदेमध्ये परिक्षेकरीता उपस्थित राहता येईल. तसेच उमेदवाराने एका जिल्हा परिषदेमध्ये एकापेक्षा अधिक पदासाठी यापुर्वी अर्ज सादर केले असतील तर संबंधित उमेदवारास संबंधित जिल्हा परिषदेमधुन एका पेक्षा जास्त पदासाठी परिक्षा देता येईल. याअनुषंगाने परिक्षेस पात्र उमेदवाराने यापुर्वी त्याने सादर केलेल्या अर्जानुसार कोणत्या जिल्हा परिषदेमधुन परिक्षेस बसणार आहे. याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक असेल.

**तसेच**

**ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.२०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्र अ मधील मुद्दा क्र. ५ खालील प्रमाणे आहे:-**

माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षकरीता उमेवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती OMR Vendor मार्फत Offline पद्धतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधुन परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेवाराने एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदाकरीता अर्ज सादर केले आहेत अशा उमेदवारंनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

**याऐवजी**

माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधिल एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पद्धतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवरांना एकाच जिल्हा परिषरदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहुन परिक्षा देता येणार आहे. तथापी ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रीका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एका पेक्षा अधिक जिल्हा परिषदांमधुन अर्ज भरलेले आहेत,त्याउमदेवराचे सर्व टिकाणी भरलेले

अर्ज ग्राह्य धरले जातील. अशा उमेदवाराबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदेअंतर्गत आयोजीत परिक्षेस उपस्थित राहुन परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणाच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतुन सदर पदभरती साठी अर्ज भरला आहे, त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय ) यादी मध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भुत केले जाईल.

तसेच नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणा-या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणा-या उमेदवाराला विभागाच्या दि.२३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहील. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वंतत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरीता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत, www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल, असे वाचावे.

शासन शुध्दीपत्रक दि २०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्र अ मधिल मुद्या क्रं ८ रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्र ब मधिल अक्र २ मधून एकापेक्षा जास्त जिल्हा परिषंदामध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हयाचा विकल्प घेणे, ही बाब वगळण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव,<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद,वाशिम | सदस्य,<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद,वाशिम | अध्यक्ष,<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी ,वाशिम |